**कैलास मानसरोवर यात्रा, 2025 प्रारंभ**

26 एप्रिल 2025

कैलास मानसरोवर यात्रेचे आयोजन परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या वतीने करण्यात येते. जून ते ऑगस्ट 2025 दरम्यान यात्रा पार पडणार आहे. यंदाच्या वर्षी प्रत्येकी 50 यात्रेकरुंच्या 5 तुकड्या या उत्तराखंड राज्यातील लिपुलेख पास आणि प्रत्येकी 50 यात्रेकरुंच्या 10 तुकड्या सिक्कीम राज्यातील नाथू ला पास येथून मार्गस्थ होतील. यात्रेकरिता अर्ज स्वीकृती सुविधेसाठी kmy.gov.in संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे. प्राप्त अर्जांमधून पारदर्शक, संगणक-निर्मित, यादृच्छिक, लिंग-समभाव आधारावर उचित निवड प्रक्रियेतून यात्रेकरुंची निवड केली जाईल.

2. 2015 पासून, यात्रेकरूंची निवड होईपर्यंत ऑनलाईन अर्जासह सुरू होणारी संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे संगणकीकृत प्रक्रिया आहे. त्यामुळे अर्जदारांना माहिती मिळवण्यासाठी पत्र किंवा फॅक्स पाठवण्याची गरज नाही. वेबसाईटवरील अभिप्राय पर्यायांचा वापर माहिती प्राप्त करण्यासाठी, निरीक्षणे नोंदवण्यासाठी किंवा सुधारणा बाबत सूचना देण्यासाठी केला जाऊ शकतो.

नवी दिल्ली

26 एप्रिल 2025